विषय :- कोरोणा विषाणु प्रसारास प्रतिबंधात्म उपाय
जिल्हा परिषद अंतर्गत कार्यालयामधिल सभा,
आयोजनाबाबत प्रतिबंध करणे बाबत.

**परिपत्रक**

सामान्य प्रशासन विभाग,जिल्हा परिषद वाशिम
परिपत्रक क्रमांक जाक्र/जिपवा/साप्रवि/आस्था-१/ 2026/२०२०
दिनांक 26 जुलै २०२०

संदर्भ :-१) या कार्यालयाचे परिपत्रक क्र/जिपावा/साप्रवि/आस्था-१/८४४/२० दिनांक १२ मार्च २०२०
२) मा. अध्यक्ष जिल्हा परिषद वाशिम यांचेशी झालेली चर्चा

संदर्भीय परिपत्रकान्वये सद्यास्थितीत बहुतांश देशामध्ये कारोना विषाणुचा प्रसार झाला असुन त्यामुळे आरोग्य विषय गंभिर परिनाम तसेच जिवीत हाणी होत असल्याचे दिसुन आले आहे. सदरचा विषाणु संसर्गजण्य असुन कोरोणा विषाणूमुळे बाधित झालेले रुग्ण महाराष्ट्रात काही ठिकाणी आढळुन आले आहेत. या बाबत मा.मुख्यमंत्री महोदय यांनी दिनांक १२/०३/२०२० च्या व्हिडीओ कॉन्फ्रन्स मध्ये कोरोणा विषानुचा प्रभाव रोखण्या करिता प्रतिबंधात्मक व खबरदारीचा उपाय म्हणुन जिल्हा परिषदेतील विविध विभागात तसेच पंचायत समिती स्तरावर कार्यालयीन कामकाजाकरीता वारंवार सभेचे आयोजन , मेळावे, व ईतर कार्यक्रम यांचे आयोजन न करण्याच्या सुचना दिल्या आहेत.त्याअनुषंगाणे सर्व खाते प्रमुख , गट विकास अधिकारी व कार्यालय प्रमुख यांना सुचीत करण्यात आले होते की, कोरोणा विषानुचा प्रभाव रोखण्या करिता प्रतिबंधात्मक व खबरदारीचा उपाय म्हणुन जिल्हा परिषदेतील विविध विभागात तसेच पंचायत समिती स्तरावर कार्यालयीन कामकाजाकरीता वारंवार सभेचे आयोजन , मेळावे, आढावा सभा व ईतर कार्यक्रम यांचे आयोजन करण्यात येवु नये. आवश्यक अहवाल व ईतर बाबी ईमेल व्दारे मागवाव्यात. सभेचे आयोजन करणे अत्यंत आवश्यक असल्यास खाते प्रमुख मार्फत माझी मान्यता घेतल्या शिवाय आयोजन तथा मान्यता देण्यात येवू नये असे सुचीत करण्यात आलेले होते.

सद्यस्थितीत वाशिम जिल्हामध्ये कारोना विषाणुचा प्रसार झाला असुन त्यामुळे आरोग्य विषय गंभिर परिनाम दिसुन आले असल्यामुळे सर्व खाते प्रमुख / कार्यालय प्रमुख यांनी कार्यालयीन कामकाजा करिता सभा घेणे आवश्यक असल्यास सर्व सभा हया ऑनलाईन पध्दतीने घेण्यात याव्यात. सभा आयोजीत करणे अत्यंत आवश्यक असल्यास तशी माझी व मा. अध्यक्ष जि. प. वाशिम यांची लेखी परवानगी घेवुनच आयोजीत करावी. त्याशिवाय कोणत्याही प्रकरची सभा कार्यालयामध्ये आयोजत करण्यात येवू नये या बाबत नोंद घ्यावी.

सदरच्या परिपत्रकाची तात्काळ अंमलबजावणी करण्यात यावी.

27/07/20

**(दीपक कुमार मीना)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद वाशिम**

प्रति,

१) मा.विभागीय आयुक्त अमरावती विभाग अमरावती यांना माहिती करिता सविनय सादर
२) मा.अध्यक्ष/ मा. उपाध्यक्ष जि.प. वाशिम यांना माहीतस्तव
३) मा.सभापती ----------------------- विषय समिती जि.प.वाशिम यांना माहीतस्तव
४) अति.मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद वाशिम यांना माहितीस्तव.
५) प्रकल्प संचालक जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा वाशिम यांना माहिती
६) खाते प्रमुख - - - - - - - - - - - - - - - - - - जि.प.वाशिम यांना माहिती व वरील प्रमाणे अमलबजावणी करीता.
७) गटविकास अधिकारी पंचायत समिती - - - -- - - - - (सर्व) यांना माहिती व वरील प्रमाणे अमलबजावणी करीता.
८) कार्यालय प्रमुख - - - - - - - - - - - - - - - - - - - (सर्व) यांना माहिती व वरील प्रमाणे अमलबजावणी करीता.

27/07/20

**(दीपक कुमार मीना)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद वाशिम**